लिपिक-टंकलेखकांच्या संयुक्त संवर्गात विकल्प दिलेल्या टंकलेखकांच्या सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेच्या संधीची गणना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:परीक्षा-२१९८/प्र.क्र.११/९८/१७,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २३ ऑक्टोबर, १९९८.

पहा :-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही. १०८९/प्र.क्र.२४/८९/१२, दि. २६ नोव्हेंबर, १९९०.
२. शासन परिपत्रक क्रमांक-सेप्रप्र २१९१/प्र.क्र. १/९१/१७, दि. १६.३.९१.
३. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्र. परीक्षा-२१९१/प्र.क्र. ११/९१/१७, दि. ७ जून, १९९१.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही. १०९५/प्र.क्र.७४/९५/१२, दि. २६ जून, १९९६.

## परिपत्रक

शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-परीक्षा. २१९१/प्र.क्र.११/९१/१७, दि. ७ जून, १९९१ मधील परि.क्र.३ मध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या टंकलेखकांनी सामान्य प्रशासन विभागाची पूर्वपरवानगी घेऊन परीक्षेला न बसल्यास त्यांची परीक्षेची संधी गमावली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही. १०८९/प्र.क्र.२४/८९/१२, दि. २६ नोव्हें. १९९०च्या अंमलबजावणीस दि. १२ एप्रिल, १९९१ ते दि. ५ सप्टें. १९९५ या कालावधीत स्थगिती लागू करण्यात आली होती. लिपिक-टंकलेखक संवर्गात विकल्प दिलेल्या टंकलेखकांसाठी स्थगिती कालावधीतील लिपिक-टंकलेखक सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेच्या संधीची संगणना कशा प्रकारे करण्यात यावी, या बाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्या संदर्भात आता असा निर्णय घेण्यात येत आहे की,

[१] १२ एप्रिल, १९९१ ते ५ सप्टेंबर, १९९५ या कालावधीत स्थगिती कारणास्तव लिपिक-टंकलेखक सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेसाठी न बसलेले जे कर्मचारी सन १९९६ ते सन १९९८ या कालावधीत परीक्षेला बसून उत्तीर्ण झाले आहेत, त्यांची ज्येष्ठता अबाधित ठेवण्यात यावी.

(२) सन १९८६ ते १९८८ या कालावधीत लिपिक-टंकलेखक संवर्गात नियुक्त्या दिलेल्या ज्या कर्मचाऱ्यांनी लिपिक-टंकलेखक सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेच्या विहित संधी उपभोगलेल्या नसतील अशा कर्मचाऱ्यांनी सन १९८९ सालातील उपलब्ध होणाऱ्या संधीत परीक्षा उत्तीर्ण केल्यास त्यांची सेवा जेष्ठता अबाधित ठेवण्यात येईल.

मंत्रालयातील सर्व विभागांना सूचित करण्यात येते की, वरील निर्णय विभागांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित टंकलेखकांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.

प्रत,
मंत्रालयातील सर्व विभाग [आस्थापना शाखा]
सामान्य प्रशासन विभाग/१२, १४.